बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बीड | सोमवार, दि.९ सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक३९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## शांततेत रहायचे असेल तर

पाटणा : वेगवेगळ्या धर्मातील लोकांना शांततेत रहायचे असेल तर माणसाचा किंवा गायीचा, कोणाचाही झुंडबळी जाता कामा नये, असे वक्तव्य रविवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) वरिष्ठ पदाधिकारी इंद्रेशकुमार यांनी केले. सरसंघचालक मोहन भागवत यांनी जातनिहाय जनगणनेच्या बाजूने व्यक्त केलेल्या मताबरोबर संघटना उभी असल्याचेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यांचे मत हे सर्व संघ स्वयंसेवकांचे मत असल्याचेही त्यांनी नमूद केले.'जात हे वास्तव आहे. आपण ते नाकारू शकत नाही. त्यामुळे जातीचे हे विष जास्तीत जास्त दूर ठेवण्याचा प्रयत्न करायला हवा. अनेक धर्म आहेत आणि असतील, आमचाही तोच दृष्टिकोन आहे.

# सरकार पडायला मागेपुढे पाहणार नाहीत!

## मनोज जरांगे: परळीमध्ये पार पडली घोंगडी बैठक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आरक्षणाची लढाई आपल्याला जिंकायची आहे. त्याशिवाय मराठा समाजाला गत्यंतर नाही. राजकारण येत राहील, होत राहील. मात्र अरक्षणापासून मराठा समाजाचे एकही घर वंचित राहणार नाही याची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. आरक्षणाच्या लढाईत आपण आता अंतिम टप्प्यात आहोत. शासनालाही आता आरक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही. सरकारने जर आरक्षण नाही दिले तर त्यांना परत आपल्याला सत्तेवर येऊ द्यायचे नाही. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात ट्रॅप रचला आहे, दररोज एक आमदार माझ्यावर गरळ ओकत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या नादाला लागू नये अन्यथा महाराष्ट्रात भाजपला बियाला माणूस उरणार नाही असा इशारा मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. ते परळी वैजनाथ येथे आयोजित घोंगडी बैठकीत बोलत होते.




परळी येथील हलगे गार्डन येथे घोंगडी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जे जे लोक आणि नेते मराठा आरक्षणाच्या विरोधात गेले आहेत त्यांना येत्या विधानसभा निवडणुकीत हिसका दाखवणार आणि घरी बसवणार. मराठा समाजाच्या आरक्षणात राजकारण आणू नये अशी कळकळीची या राज्यकर्त्यांना विनंती आहे. फडणवीसांनी माझ्यावर सापळे रचण्यात वेळ घालवण्यापेक्षा गोरगरीब मराठा समाजाच्या घरात जाऊन बसावे आणि त्यांच्या वेदना समजून घ्याव्यात म्हणजे त्यांना समजेल की मराठा समाजाला आरक्षण कशासाठी लागते?

### भव्यदिव्य शोभायात्रा आणि सत्कार

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे रविवारी परळी वैजनाथ येथे घोंगडी बैठकीच्या निमित्ताने आले होते. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्यास हार घालून अभिवादन केले. यानंतर शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. मराठा समाज बांधवांच्या वतीने जरांगे पाटील यांचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

मराठा समाजाच्या वेदना आणि अडचणी प्रचंड आहेत त्यांनी अगोदर त्या समजून घ्याव्यात. कष्ट करून लेकर शिकवायला काय संघर्ष करावा लागतो हे या निष्ठुर शासनाला कधीही कळणार नाही. मराठ्यांनी फडणवीसांनी मनमानी ऐकून घेण्यासाठी लेकरं शिकवले नाहीत.

मराठ्यांचे आमदार मराठ्यांच्या लेकरांच्या मुळावर उठले आहेत. फडणवीस मराठ्यांच्या लेकरांना तडपायची वेळ आणत आहेत. आमचे लेकरे आम्ही कष्ट करून शिकवत आहोत. मराठा आणि कुणबी एक असताना शासन जाणीवपूर्वक या गोष्टी मान्य करत नाही. ज्या नोंदी सापडल्या त्याही रोखून धरण्याचे कटकारस्थान हे सरकार करीत आहे. जे राज्यकर्ते स्वतः जातीयवादी आहेत, तेच आम्हाला जातीयवाद शिकवतात याचं आश्चर्य वाटत.

मराठ्यांनी मनावर घेतल तर आरक्षणाच्या विरोधातील नेत्यांना घराच्या बाहेर पडू देणार नाहीत. मात्र हा समाज माझ्याकडे पाहून गप्प बसतो आहे. मराठा समाजाच्या विरोधात गेले तर एकही आमदार महाराष्ट्रात निवडून येऊ देणार नाही. मराठा समाज ज्यांना निवडून देतो, ज्यांना मतदान करतो, ज्यांच्या निवडून आल्यानंतर मिरवणुका काढून डिजे वर नाचतो. त्याच समाजाच्या विरोधात हे निवडून गेलेले आमदार काम करत आहेत. त्यामुळे आता इथून पुढे मराठा समाजाने समाजाचे शत्रू ओळखले पाहिजेत. त्यांना येथून पुढे दरात उभे करू नका. आपलीच लेकरे आपल्याला विचारणार आहेत. हे हरामखोरी राज्यकर्ते तुम्हाला विचारायला येणार नाहीत असे प्रखर विचार मनोज जरांगे पाटील यांनी परळी शहरातील घोंगडी बैठकीत व्यक्त केले. मी समाजासाठी पोटाला चिमटा घेऊन उपाशी मेलोय, या कुटील राज्यकर्त्यांना अंगावर घेतलंय. मी यापुढेही समाजासाठी माझा जीव देईल मात्र समाज बांधवांनी या असल्या राज्यकर्त्यांच्या पाठीमागे धाऊ नका असेही ते म्हणाले.

### रात्री भेटण्यास येणाऱ्यांची तर

मागील अनेक दिवसांपासून माझ्या भेटीला अनेक नेते येत आहेत. रात्रीच्या भेटी घेणारे तर संख्या खूप मोठी आहे. त्यातही भाजपचे लोक जास्त आहेत. राजकीय अस्तित्व धोक्यात आल्याने ते मला भेटायला येतात, म्हणून मला रात्रभर जागावे लागते. मला कुठल्याही राजकीय भूमिकेत अजिबात जायचे नाही. मी कोणत्याही नेत्यांच्या स्वतःहून वाट्याला गेलो नाही. मात्र जर माझ्या आणि समाजाच्या वाट्याला गेले तर मात्र त्यांची हायगय केली जाणार नाही. मी असल्यांना अजिबात सुट्टी देणार नाही हे परळीच्या पवित्र भूमीतून सांगतो असाही इशारा त्यांनी दिला.



## विधानसभेसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान?

### पडघम: अशोक चव्हाण यांचा अंदाज

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर करण्याचा अधिकार निवडणूक आयोगाचा आहे. परंतु, पुढील महिन्यात म्हणजे ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता लागू होऊन नोव्हेंबरमध्ये मतदान होईल, असा अंदाज व्यक्त केला जात असल्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी सांगितले. आमदार बबनराव लोणीकर

पान २ वर...

### पवारांच्या डोक्यातले आम्हाला काय करायचे ?

शरद पवार यांच्या डोक्यात काय चालले आहे, हे देवेंद्र फडणवीस यांना शंभर जन्म घेतले तरी कळणार नाही, असे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले होते. या वक्तव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना चव्हाण म्हणाले, शरद पवार यांच्या डोक्यात काय चालले आहे याच्याशी आम्हाला काय करायचे ? आम्हाला आमच्या डोक्याने काम करायचे आहे.

## गणेश चतुर्थीला मिरवणुकीवर दगडफेक

### अलर्ट: मध्य प्रदेशातील रतलाममध्ये तणाव

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

मध्य प्रदेशातील रतलाममध्ये गणेश चतुर्थीच्या मिरवणुकीवर काही अज्ञातांनी दगडफेक केल्याची घटना घडली आहे. या दगडफेकीत काही लोक जखमी झाले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल असून शहरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रतलामध्ये सध्या तणावपूर्ण शांतता आहे.इंडियन एक्सप्रेसने पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, शनिवारी रात्री हा प्रकार घडला. शहरातील मोचीपुरा भागातून



गणपतीची मिरवणूक जात असताना अज्ञातांनी अचानक दगडफेक सुरू केली. या घटनेनंतर आरोपींना पकडण्याची मागणी करण्यासाठी नागरिकांनी पोलीस ठाण्याला घेराव घातला. महत्त्वाचे म्हणजे पोलीस घटनास्थळी दाखल होताच त्यांच्या वाहनांवरही दगडफेक करण्यात आली. यात पोलिसांच्या गाडीच्या काचाही फुटल्या.यासंदर्भात बोलताना पोलीस अधिक्षक म्हणाले, रतलामध्ये सध्या

पान २ वर...

## कुटुंबातील फूट समाज स्वीकारत नाही

### खंत: मलाही याचा अनुभव, अजित पवारांची कबुली!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवारांनी मोठे बंड केले. पक्षातील ४० आमदारांना बरोबर घेऊन त्यांनी पक्षावर दावा ठोकला. यामुळे पवार कुटुंबातही मोठी फूट पडली. परिणामी कुटुंबातील फूट समाजाला आवडत नाही, हे आपण अनुभवले असल्याचं राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी म्हटलंय. तसंच, याबाबत त्यांनी त्यांची चूकही मान्य केली आहे. शुक्रवारी गडचिरोली शहरात राष्ट्रवादी काँग्रेसने आयोजित केलेल्या जनसन्मान रॅलीला संबोधित करताना अजित पवार बोलत होते.टाईम्स ऑफ इंडियाने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.लोकसभा निवडणुकीत अजित पवार गटाचा दारूण पराभव झाला. बारामती लोकसभा मतदारसंघात सुनेत्रा पवारांना उमेदवारी देण्यात आली. परंतु, सुनेत्रा पवारांचा पराभव झाला. या जागेवरून सुनेत्रा पवारांना उमेदवारी देणं ही आपली चूक होती, अशी कबुलीही अजित पवारांनी काही दिवसांपूर्वी दिली होती. आता त्यांनी कुटुंबातील फुटीचा राजकीय क्षेत्रावर परिणाम झाल्याची कबुली त्यांनी दिली आहे.आगामी विधानसभा निवडणुकीत राजकीय इतिहासातील एक वेगळा वाद पाहायला मिळण्याची

पान २ वर...

## रायगड जिल्ह्यात एकाच कुटुंबातील तिघांची हत्या

### खळबळ:नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

रायगड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अलिबाग– रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चिकनपाडा गावात एकाच कुटुंबातील तिघांची हत्या करण्यात आली आहे. मृतांमध्ये पती, पत्नी आणि एका मुलाचा समावेश आहे. नेरळ पोलीस ठाण्यात या प्रकरणी अज्ञाताविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, कर्जतचे उपविभागीय



पोलीस अधिकारी धुळा टेळे या प्रकरणाचा तपास करत आहेत.मदन जैतु पाटील वय

पान २ वर...

## ...एकदा तरी जय भिम म्हणा?

### चर्चा: मुंदडाने फक्त राखीव मतदार संघाचा फायदा घेतला

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज राखीव मतदार संघाचे ३० वर्षाहुन आधिक मुंदडा घराने मागील दाराने आमदार मंत्री होत आलेले आहेत वास्तविक पाहता हा मतदार संघ कष्ट करणारे विस्तापित मागासवर्गीय लोकासाठी राखीव आहे असे आसताना पहिले गरीबीचे ढोंग करुन विकास न करता फक्त वाढदिवस,अंत्यविधी,लग्न,सत यनारायण,सरकारी दवाखान्यात न बोलविता डॉक्टर वर विलाज करण्याआगोदर यांना कळवने बंधनकारक आहे मग जनतेला



यांना कळवने क्रमपात्र आहे मग यांचे पन श्रेय यांचेच पंचायत समिती,तहसिल कार्यालय,पोलीस स्टेशन,

पान २ वर...

## धनंजय मुंडे: परळीत गणेश महोत्सवाचे शानदार उदघाटन

# नाथ प्रतिष्ठान सुखदु:खाचा साथीदार!

परळी/वैजनाथ प्रतिनिधी

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या १९व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे शानदार उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेत्री पुष्पा फेम रश्मिका मंदांना व आदीपुरुष रामायणातील सीताफेम कृती सेनान यांच्या प्रमुख उपस्थिती झाले. यावेळी तमाम परळीकरांना स्मित हास्य देत रश्मिका मंदांना व गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष करत अभिनेत्री कृती सेनान यांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. तर या व्यासपीठावरून विरोधकांचा खरपूस समाचार घेत धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वेळोवेळी केलेल्या सामाजिक दायित्वाची साक्ष उपस्थितांसमोर मांडली.

धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही परळीकरांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी म्हणजेच वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांचे व कला सादरीकरणाचे

पान २ वर...



### मुंडेंची शायरी अन् ईशारा

परळी विधानसभा मतदारसंघात देखील अनेक इच्छुक वेगवेगळ्या पक्षांकडून तयारी करत असून, वेगवेगळ्या अफवा पसरवणे व टीका करण्याचे काम करत आहेत, त्यांना धनंजय मुंडे यांनी त्यांच्या खास शैलीत 'सही वक्त पर करवा देंगे हदो को एहसास, कुछ नाले खुद को समंदर समझ बैठे है' या खास शायरीतून ईशारा दिला आहे!

### रश्मिका मंदांनीने जिंकली मने

या कार्यक्रमाच्या उद्घाटिका प्रसिद्ध अभिनेत्री रश्मिका मंदांना यांनी नाथ प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमाचे कौतुक करतानाच सर्वांना आपल्या स्मित हास्याने भुरळ घातली.तर रामायणातील सीताफेमा अभिनेत्री कृती सेनान यांनी 'जय श्रीराम' चा नारा देत 'गणपती बप्पा मोरया' असे म्हणत नाथ प्रतिष्ठानने आयोजित केलेला हा महोत्सव सर्वांसाठी एक मेजवानीच असल्याचे म्हणत धनंजय मुंडे यांच्या भव्य आयोजनाचे कौतुक केले.

## बैलगाडीतून काढली भव्य मिरवणूक!

### अभिनंदनिय : ॲड.सुभाष राऊत यांचा भव्य सत्कार

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

अखिल भारतीय समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ना. ड. सुभाष (भाऊ) राऊत यांची राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी (राज्यमंत्री दर्जा) निवड झाल्याबद्दल चिंचोलीमाळी या त्यांच्या मूळ गावी भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सत्कार समारंभ पूर्वी बैलगाडीतून वाजत गाजत भव्य मिरवणूक काढून जेसीबीतून फुलांचा वर्षाव, फटाक्यांची आतिषबाजी करत भव्य दिव्य नागरी सत्कार आज चिंचोली माळी येथे करण्यात आला आहे.



राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांना आयुष्यातील पांडुरंग मानत समता परिषदेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदापासून भुजबळ साहेबांवर आलेल्या प्रत्येक संकटाप्रसंगी साथ देत एकनिष्ठ राहून स्वतःच्या संसाराची राख रांगोळी झाली तरी मी माझ्या पांडुरंगाची साथ सोडणार नाही अशी कायम भूमिका घेणाऱ्या ड. सुभाष राऊत यांना त्यांच्या कष्टाचे आणि त्यागाचे फळ अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनरावजी भुजबळ, राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडवणीस, ना. अजित दादा पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून मिळाले आहे. केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील मूळ रहिवासी असलेले आणि बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर मोठा जनसंपर्क असलेले ना. ड.सुभाष राऊत यांचा आज त्यांच्या मूळ गावी केज

पान २ वर...

## आणखी एक माघार?

वस्तू–सेवा कर परिषदेची (जीएसटी कौन्सिल) ५४ वी बैठक राजधानी दिल्लीत सोमवारी– ९ सप्टेंबर रोजी– भरत असून त्यात वैद्याकीय विमा आणि तत्संबंधी खर्चावरील कर आणि अनेक मुद्दे चर्चिले जातील. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर देशात भाजपच्या जागी 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी' (रालोआ) सरकार सत्तेवर आले. त्यानंतरची ही दुसरी बैठक. हा कर अस्तित्वात आल्यापासून गेल्या सात वर्षांत या परिषदेच्या ५३ बैठका झाल्या. ही संख्या कमी नव्हे. पण तरीही वस्तू–सेवा कराच्या मुद्द्यावर देशाचे चाचपडणे अजूनही सुरूच आहे. या बैठकीच्या पूर्वसप्ताहात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या कराच्या मुद्द्यावर केंद्र आणि राज्य सरकारे यांत कोणतेही घर्षण नाही, असे विधान केले. कसे होणार? भाजपेतर राज्ये सोडली तर या करावरून किरकिर करण्याची हिंमत दाखवणार कोण? पश्चिम बंगाल, तमिळनाडू, 'महाविकास आघाडी'च्या काळात महाराष्ट्र सरकार आदींनी या कराच्या अन्याय्य मुद्द्यांबाबत वेळोवेळी आवाज उठवला. उद्धव ठाकरे यांनी तर मुख्यमंत्री या नात्याने या कराच्या पुनर्रचनेची मागणी केली. तमिळनाडूचे माजी अर्थमंत्री डॉ. पलानी त्यागराजन यांच्यासारख्याने या कररचनेतील विसंवाद आक्रमकपणे मांडून वस्तू–सेवा कराची अब्रूच काढली. तेव्हा या सगळ्यास घर्षण न मानणे म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत उलट 'आमची कामगिरी सुधारली' असे भाजपने म्हणण्यासारखे आहे. तसे ते म्हणतातही. तेव्हा अर्थमंत्र्यांच्या 'सर्व काही छान छान' वक्तव्याकडे दुर्लक्ष करून या बैठकीसमोरील कामकाजावर दृष्टिक्षेप टाकायला हवा.परदेशी विमान कंपन्यांस करसवलत, करावरील अधिभाराची फेररचना, कर्करोग वा अन्य गंभीर आजारांवरील उपचार खर्चावर करसवलत, विजेच्या मीटरवरील कराचा फेरविचार, घरबांधणी उद्योगसंबंधी विविध घटकांवरील कर आकारणीचा आढावा, वस्त्रोद्योग, मिश्र इंधनावर (हायब्रिड) चालणाऱ्या वाहनांस द्यावे लागणारे कर आदी मुद्दे या बैठकीत चर्चिले जातील. या विषयांचा तपशिलात उल्लेख केला कारण त्यावरून वस्तू–सेवा कराची रचना किती ढिसाळ आहे हे लक्षात यावे. यातील प्रत्येक मुद्दा हा या सरकारच्या कृतीतून निर्माण झालेला आहे. म्हणजे आधी निर्णय घ्यायचा आणि त्याच्या परिणामांवर फारच बोंबाबोंब होत आहे असे दिसल्यास 'रॅशनलायझेशन' असे म्हणत तो निर्णय ठीकठाक करायचा. हे असेच सुरू आहे. महिलांच्या मासिक पाळीत वापरावयाच्या 'पॅड्स'वर एक कर आणि त्याच उपयोगासाठी वापरल्या जाणाऱ्या 'टॅंपून्स'वर दुसरा कर! कोणत्याही एकाच वापराच्या दोन वस्तूंवरील करआकारणीत असा विसंवाद हास्यास्पद ठरतो आणि तो करणारे हे कर–मंडळ विनोदी वाङ्मयासाठी अमर्याद कच्चा माल सातत्याने पुरवताना दिसते. या आधीच्या ५३ व्या बैठकीत रेल्वे फलाट तिकीट, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निवासाचे भाडे यांस कर सवलत वा माफी, करनोंदणीसाठी 'आधार' सक्ती, दुधाच्या कॅन्सवर सरसकट १२ टक्के करआकारणी, अग्निशमन यंत्रणांवरील करात सवलत इत्यादी फुटकळ निर्णय घेतले गेले. ''अर्थमंत्रालयातील कनिष्ठ कारकून जे करू शकला असता ते निर्णय घेण्यासाठी देशातील राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या वस्तू–सेवा कर परिषदेची गरज काय हा प्रश्न या बैठकीचे फलित पाहिल्यावर पडतो,'' असे 'लोकसत्ता'ने २५ जूनच्या संपादकीयात ('अवघा अपंगत्वी आनंद') त्यावर लिहिले.याचे कारण हा कर अजूनही स्थिरावलेला नाही. तो तसा स्थिरावावा यासाठी जे काही करायला हवे ते सरकार करू इच्छित नाही. पेट्रोल–डिझेलादी इंधन या कराच्या जाळ्यात आणणे, मद्यावर वस्तू–सेवा कर लावणे आदी उपाय त्यासाठी अत्यावश्यक आहेत. पण ते करण्याची सरकारची राजकीय हिंमत नाही. ''इंधन हा विषय या कराच्या जाळ्यात आणून त्यावर किती टक्के कर आकारला जावा हे राज्या–राज्यांनी ठरवावे'' असा शहाजोग सल्ला अर्थमंत्री निर्मलाबाई गेल्या बैठकीनंतर देतात. ''तुमचे तुम्ही पाहा'' हे सांगण्यास अर्थमंत्र्यांची गरजच काय? तसे राज्ये त्यांच्या पद्धतीने त्यांना हवे ते करत आहेतच. त्यामुळे तेलंगणासारख्या राज्यात आज पेट्रोल–डिझेलवर ३५ टक्के मूल्यवर्धित कर (व्हॅट) आकारला जातो तर केंद्रशासित लक्षद्वीपात या कराचे प्रमाण फक्त एक टक्का इतके आहे. इंधन खर्च हा कोणत्याही घटकाच्या किमतीतील कळीचा मुद्दा. त्यातच भिन्नता राहिल्याने वस्तूंच्या किमतीत देशभर समानता येईलच कशी? ती यावी यासाठीच तर वस्तू–सेवा कर आणला गेला. इंधनाच्या मुद्द्यावर भाजपेतर राज्यांस बोल लावण्यास हे सरकार पुढे. पण महाराष्ट्रासारख्या राज्यात हे दर का कमी होत नाहीत, याचे उत्तर सरकारकडे नाही. परत राज्यांस इंधनकरावर हवे ते करू देण्याची मुभा (?) देण्यात खुद्द केंद्र सरकारचेच हितसंबंध आहेत; त्याचे काय? कारण वस्तू–सेवा कर आकारल्यानंतरही केंद्र सरकार इंधनावर अधिभार (सेस) लावते. या अधिभाराचा ना हिशेब द्यावा लागतो ना राज्यांस त्यांतील वाटा देणे बंधनकारक असते. म्हणजे पुढे करायचे राज्यांस. त्यातही भाजपेतर राज्यांस दोष अधिक द्यायचा. आणि प्रत्यक्षात निर्णय घ्यायचे स्वत:च्या झोळीत अधिक रक्कम जमा होईल असे. आणि इतके करूनही या कर व्यवस्थेची कंबर वाकडी ती वाकडीच. तरीही आर्थिक सुधारणांचे डिंडिम हे सरकार पिटत राहणार आणि अर्थसाक्षरता बेतासबात असलेला समाज ही लोणकढी गोड मानून घेणार.


# भाविक भक्तांचा लोटला मेळा!

## अध्यात्मिक: परळीत संतश्री गुरूलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सव

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

वीरशैव समाज परळीच्या वतीने श्री संत श्रेष्ठ गुरुलिंग स्वामी यांचा १२३ वा पुण्यतिथी महोत्सव व अखंड शिवनाम सप्ताहास आज शनिवार दिनांक ७ सप्टेंबपासून भाविक भक्तांच्या उपस्थितीत उत्साहात प्रारंभ झाला आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री संत श्रेष्ठ गुरुलिंग स्वामी , संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन श्री व सौ चंद्रकांतआप्पा बुरांडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती. प्रतिवर्षाप्रमाणे अखंड शिवनाम सप्ताह, पालखी सोहळा, भंडारा असे सर्व पारंपारिक कार्यक्रम दिनांक १३ सप्टेंबर पर्यंत होणार असून श्री सदगुरू १०८ सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांच्या उपस्थितीत सर्व कार्यक्रम होणार आहेत.

श्री गुरूलिंग स्वामी पुण्यतिथी महोत्सव यावर्षी विविध सामाजिक, धार्मीक उपक्रम व पारंपारिक भंडारा कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा होत आहे. बेलवाडी येथे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरूजी व समस्त विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावरणात होत आहे. सप्ताहात अखंड शिवनाम, श्री गुरूलिंग स्वामींचा पालखी महोत्सव, कीर्तन, प्रवचन आदी धार्मीक कार्यक्रम श्री सदगुरू सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेर्डेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री संत श्रेष्ठ गुरुलिंग स्वामी मंदिरात आरती व महाप्रसाद होईल त्याच दिवशी रात्री ठीक ८ वाजता श्रींची पालखी मिरवणूक निघेल, रात्री ९ वाजता पालखी वैद्यनाथ मंदिरात थांबणार असून दुसर्या दिवशी १४ सप्टेंबर शनिवार रोजी श्रींची पालखी सकाळी ७ वाजता श्री वैद्यनाथ मंदिरातून निघून श्री वक्रेश्वर मंदिर येथे जाणार आहे तेथून सकाळी ९ वाजता पालखी मिरवणूक परळी शहरातील प्रमुख रस्त्यावरून निघणार असून पालखीसोबत व पारायणासाठी समाजातील प्रत्येक घरातून किमान एका व्यक्तीने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता या पालखी मिरवणुकीचे विसर्जन श्री संत श्रेष्ठ गुरुलिंग स्वामी मंदिरात होणार असून तदनंतर आरती व महाप्रसाद होणार आहे. दैनिक कार्यक्रम पुढीलप्रमाणे दररोज सकाळी ७ ते ८ शिव सहस्त्रनामावली, सकाळी ९ ते ११ परमरहस्य व श्री पलसिद्ध महात्म्य पारायण श्री गुरु क्ष. प्र १०८ सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेड्रेकर सकाळी १०.३० ते १२ पर्यंत श्री मन्मथ स्वामी गाथावरील भजन दुपारी ३ ते ५ व शिव पाठ आरती सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजेपर्यंत होणार आहे श्री गुरु १०८ वेदांताचार्य सिद्धलिंग शिवाचार्य महाराज साखरखेडेकर यांचे प्रवचन रात्री ८ ते १० किर्तन असून तदनंतर जागर कार्यक्रम होणार आहे परम रहस्याचे पारायण प्रमुख शि.भ.प. व्यंकट मारुती आप्पा होनशेटे हे करणार आहे. या कार्यक्रमास वीरशैव समाजातील सर्व महिला पुरुष व सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन गुरुलिंग स्वामी देवस्थान चे अध्यक्ष दत्ताप्पा ईटके गुरूजी व सर्व विश्वस्त तसेच समस्त वीरशैव लिंगायत समाज परळी यांनी केले आहे.



## सम्यक संवाद मेळाव्याचे आयोजन

### लिंबराज गायकवाड : विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाडा विभागातील बीड जिल्हा सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने बीड जिल्हास्तरीय सम्यक संवाद मेळाव्याचे आयोजन शिक्षणाचे माहेरघर अंबाजोगाई येथे सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने करण्यात आले आहे. प्रा.अंजलीताई आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रदेश उपाध्यक्ष ॲड.सर्वजीत बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.०९ सप्टेंबर सोमवार रोजी हा मेळावा होणार आहे या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड यांनी केले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संशोधक, पीएचडी धारकांचा प्रश्न, थेट परिपत्रक जाचक नियम व अटी व रद्द प्रश्न, शिष्यवृत्ती जाचक नियम व अटी, मुलांचे, मुलींचे वस्तीगृह प्रश्न, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातील अडचणींचा प्रश्न अशा शैक्षणिक क्षेत्रातील अनेक प्रश्नावर या सम्यक संवाद मेळाव्यामध्ये चर्चा होणार असून मार्ग निघणार आहे.तरी सदरचा मेळावा हा अंबाजोगाई येथील हॉटेल ईट अँड स्टे येथे आज दुपारी १२ वाजण्यापासून सुरु होत असून या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लिंबराज गायकवाड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पान एक वरून

### गणेश चतुर्थीला मिरवणुकीवर

परिस्थिती नियंत्रणात असून येथे तणावपूर्ण शांतता आहे. या दगडफेकीच्या घटनेत काही लोक जखमी झाले आहेत. त्यांना उपाचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या दगडफेकीमुळे गणपतीच्या मुर्तीचं कोणतेही नुकसान झालेलं नाही. सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैन्यात केला आहे. पुढे बोलाताना, याप्रकरणी काही अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्हीच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

### विधानसभेसाठी नोव्हेंबरमध्ये

यांनी कार्यकर्त्यांच्या भाजप पक्ष प्रवेशानिमित्त परतूर येथे आयोजित कार्यक्रमासाठी ते जालना जिल्ह्यात रविवारी आले होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना चव्हाण म्हणाले, या वेळेस भाजप आणि महायुतीमधील पक्षांना पूर्वीपेक्षा अधिक जागा मिळतील. मनोज जरांगे पाटील यांच्याशी आमचा समन्वय सुरू आहे. काही गैरसमज दूर झाले असून काही दूर होतील. काही प्रश्न शिल्लक आहेत. ओबीसी आरक्षणाच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले, कुणाचे आरक्षण काढून घेणे सोपे नाही. या विषयावर कुठेही वाद होऊ नये, याची काळजी घ्यावी लागते. मराठा समाजास दहा टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे. ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या त्यांना तशी प्रमाणपत्रे देण्यात येत आहेत. जे उर्वरीत प्रश्न बाकी आहेत, त्याबाबत नक्की पाठपुरावा करण्यात येत आहे. चर्चेतून आणि समन्वयातून मार्ग काढण्याचे प्रयत्न आहेत.

### कुटुंबातील फूट समाज स्वीकारत

शक्यता आहे. महाराष्ट्राचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांच्याविरोधात त्यांचीच मुलगी भाग्यश्री अत्राम शड्डू ठोकण्याच्या तयारीत आहे. अहेरी विधानसभा निवडणुकीत भाग्यश्री अत्राम या शरद पवार गटाच्या बाजूने उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यावरून धर्मरावबाबा अत्राम यांनी आपल्या लेक आणि जावयाबाबत वादग्रस्त विधान केले होते. माझी मुलगी आणि जावयावर माझा विश्वास नाही. त्यांनी माझा विश्वासघात केला आहे. सगळ्यांनी त्यांना प्राणहिता नदी फेकून दिलं पाहिजे, असं अत्राम म्हणाले.तुम्ही तुमच्या वडिलांना पाठिंबा द्यावा आणि त्यांना जिंकण्यासाठी मदत केली पाहिजे. कारण त्यांच्याकडेच या प्रदेशाचा विकास करण्याची क्षमता आणि दृष्टीकोन आहे. समाज कधीही कुटुंबातील फूट स्वीकारत नाही. मी ही तेच अनुभवले आहे. मी माझी चूक मान्य केली आहे, असं म्हणत अजित पवारांनी कबुली दिली आहे.

### रायगड जिल्ह्यात एकाच कुटुंबातील

३५, अनिशा मदन पाटील वय ३० आणि विनायक मदन पाटील वय १० अशी तिघांची नावे आहे. चिकनपाडा गावात घराच्या मागील भागात असलेल्या ओढ्यात तिघांचे मृतदेह रविवारी सकाळी आढळून आले. तिघांच्या डोक्यावर धारधार शस्त्राने वार केल्याच्या खूणा आढळून आल्या आहेत. त्यामुळे तिघांची हत्या करून त्यांचे मृतदेह नदीपात्रात टाकण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. हत्या झालेली अनिशाही सात महिन्यांची गर्भवती होती अशी माहिती समोर आली आहे.पाटील कुटुंब गेल्या दहा ते १२ वर्षांपासून या परिसरात वास्तव्याला होते. आज पहाटे त्यांचे मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. याबाबतची माहिती मिळताच नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृतदेह पंचनामा करून शवविच्छेदनासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. या हत्येमागचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. दरम्यान या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपास सुरू आहे. ऐन गणेशोत्सवाच्या धामधूमीत ही घटना घडल्याने चिकनपाडा गावावर दुखाचे सावट आहे.

### ...एकदा तरी जय भिम

कृषी कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग सर्व ग्रामसेवक ,तलाठी ,मंडळआधिकारी,नायब तहसिलदार ,तहसिलदार ,बिडिओ, बांधकाम विभागाचे इंजिनियर, पोलीस निरिक्षक,पोलीस उपअधिक्षक या सर्वानी या नंदकिशोर मुंदडा यांना भेटने व कामकाजाची माहीती देणे बंधनकारकच आहे जर माहीती दिली नाही की विधानसभेमधे तारांकित प्रश्न विचारुन नौकरदारांना अडचनित आणतात या राखीव मतदार संघाच्या मतदाराचे नसिबच भव्य दिव्य आहे मतदार करतात एकच मत पन आमदार होतात तीन १ नंदकिशोर मुंदडा २ अक्षय मुंदडा ३ नमिता मुंदडा हे तीन आमदार होतात हे जाहगीरदार आसल्यासारखे आप आपले जाहगीर्या वाटुन घेतल्यात अंबाजोगाई शहर अक्षय मुंदडा अंबाजोगाई ग्रामिण नंदकिशोर मुंदडा केज मतदार संघ नंदकिशोर मुंदडा नेकनुर( बीड) अक्षय मुंदडा व नमिताताई मुंदडा गरज पडली तर उद्घाटन किंवा विधानसभेमधे नंदुसेठ सांगण्यावरुन तक्रारीवरुन सक्रिय होणे असे विविध विकासाची कामे हे तीन आमदार करत आसतात अशा भावना नागरिकांन मधुन व्यक्त केल्या जात आहेत.

### नाथ प्रतिष्ठान सुखदुःखाचा

कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे आज झाले. यावेळी व्यासपीठावर धनंजय मुंडे यांच्यासह नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच आदीपुरुष रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सेनान या दोघींची प्रमुख उपस्थिती होती. तर या उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे यांनी केले.

पहिल्या दिवशी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम झाला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद देत टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात परळीकर रसिक ,प्रेक्षकांनी दाद दिली. कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा अतिशय भव्य दिव्य व नेत्र दीपक अशा पद्धतीने झाला. यावेळी धनंजय मुंडे, सौ. राजश्रीताई मुंडे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर कलाकारांचा नाथ प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.यावेळी युवक नेते अजय मुंडे, नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मिक अण्णा कराड यांसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे मान्यवर नेते व पदाधिकारी यांसह आदी उपस्थित होते.

### बैलगाडीतून काढली भव्य

तालुक्यातील चिंचोली माळी येथे भव्य नागरी सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी बैलगाडी मधून त्यांची संपूर्ण गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावातील प्रत्येक नागरिकांमध्ये हर्ष उल्हास संचारला होता. फटाक्यांची आतिषबाजी करत या मिरवणुकीने नंतर सभेचे स्वरूप प्राप्त केले. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार संपन्न झाला.सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे सुनील आबा गलांडे, माधव तात्या निर्मळ, युवा नेते विष्णू भाऊ घुले, भगवान आबा केदार, डॉ वासुदेव नेहरकर,नारायण दादा शिंदे,भगवान काळे, अरुण तात्या काळे, सरपंच सुनील देशमुख, उपसरपंच धीरज वणवे, जितेंद्र देशमुख,राम मेजर राऊत ,विजय माने, ॲड. सपाटे, सरकारी वकील ॲड.वनवे, मेजर अजिमोद्दीन शेख, चंद्रकांत खरात, संजीवनी राऊत, मालोजी गलांडे, अविनाश उगले, दादासाहेब ससाने, सचिन राऊत, सरपंच अशोक राऊत, अभिजित राऊत, रवी गायकवाड,नारायण नकाते,सचिन नेहरकर कानडी माळी सरपंच , बाळासाहेब राऊत, कपिल राऊत, मल्हारी बारगजे, विक्रम घुले , राजेंद्र बारगजे, दिगंबर मुंडे ,प्रकाशबारगजे संतोष घुले यांच्या सह अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच गावातील बहुसंख्य नागरिक मोठ्या उत्साहाने मिरवणुकीत सामील होऊन ड. ना. सुभाष भाऊचा भव्य असा नागरी सत्कार करण्यात आला.

## पान सहा वरून

### समीर काझी वक्फ बोर्डाला

असल्याने नागरीकांना होणारा त्रास कमी होणार होणार आहे. आपल्या अभ्यासू आणि अनुभवी वृत्तीचा फायदा समीर काझी यांच्या माध्यमातून त्यांच्या कामात होणार असल्याचे सलीम जहाँगीर यांनी सांगितले. यावेळी नूर लाला खान, रफिक कुरेशी,रियाज सिद्दीकी, आमु सय्यद , रविंद्र शिंगारे, सज्जाद काझी, वहिद पठाण, युनूस शेख, तकी शेख, सोयल बेग, अनीस शेख आदींची उपस्थिती होती.

### परळीकरांची सेवा

असून कुटुंबांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्ती मध्ये नाथ प्रतिष्ठान पुढाकार घेत परळीवासीयांच्या मदतीला पावलोपावली धाव घेत असते. आर्थिक दुर्बल कुटुंबातील हजारो मुलींचे सामुदायिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून कन्यादान करण्याचे कामही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने आजवर करण्यात आलेले आहे. कडक लॉकडाउनच्या काळात देखील हजारो कुटुंबांपर्यंत अन्नधान्य किराणा भाजीपाला तसेच औषधी ते अगदी रेमडिसिव्हीर मोफत पोहोचवण्याचे काम सुद्धा नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात आलेले आहे. दिवाळी, ईद, गणेशोत्सव यासारख्या सणांच्या काळामध्ये देखील नाथ प्रतिष्ठानने अनेक वर्षांपासून आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.यावेळी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे, रा.कॉ.चे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शकील कुरेशी, अय्युब पठाण, शंकर आडेपवार, विजय भोयटे, नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन कुलकर्णी, उपाध्यक्ष शंकर कापसे, अजीज कच्छी, अन्वर मिस्किन, इस्माईल पटेल, रवी मुळे, अनंत इंगळे, अल्ताफ पठाण, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य अनेराव, युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष गोविंद कराड, लाला खान, गफार काकर, जावेद कुरेशी, राजू शेख, सुरेश नानवटे, गौस कुरेशी, अश्फाक शेख, नायब तहसिलदार बाबुराव रुपनर, न.प.चे कार्यालय अधीक्षक संतोष रोडे यांसह आदी उपस्थित होते.

### घरकुल योजनेपासून वंचित

एक हजार ६८३ लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाले असल्याची माहिती अब्दुल सत्तार यांनी दिली आहे. त्यामुळे बेघरांचे स्वप्न साकार होऊन त्यांना हक्काचे घर मिळणार आहे.( सप्टेंबर ता.१५) प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुल योजनेचा लाभ जमा होणार आहे. अनुसूचित जाती – जमाती व इतर अशा लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत कडे गटविकास अधिकारी दादाराव आहिरे यांनी सादर केल्या आहेत. त्याअनुषंगाने सदरील लाभार्थ्यांनी आपले आधारकार्ड , बँक पासबुक, जातीचा दाखला, जॉबकार्ड, स्वतःची जागा उपलब्ध असल्याचा दाखला पंचायत समितीत दाखल करावेत असे आवाहन प्रशासनाने केले आहे

### म्हणून क्लासवन अधिकारी

घेतला आणि त्यातूनच त्यांना अधिकारी होण्याची प्रेरणा मिळाली. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्राचार्य श्याम भुतडा सर यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच आज मी अधिकारी झालो असल्याचे यावेळी सुदाम मुंडे म्हणाले. मुंडे यांच्या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालिका डॉक्टर आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, प्रशासकीय अधिकारी डॉ. संतोष लहाने यांच्यासह आदित्य शिक्षण संस्थेतील प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.

### हमीभावाने सोयाबीन

सातत्याने पत्र व्यवहार व पाठपुरावा केला तसेच यासंदर्भात केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी देखील वारंवार संपर्कात होतो. केंद्र सरकारने ९० दिवसांकरिता हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अधिकचा आर्थिक लाभ मिळणार असल्याचा मला मनापासून आनंद होतो आहे, अशा भावना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या आहेत.मागील वर्षी सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र त्याही परिस्थितीत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करून राज्य शासनाच्या वतीने सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. यासाठी राज्य सरकारने ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून दिले असून येत्या दोन–तीन दिवसात या अनुदानाचे थेट वितरण शेतकऱ्यांच्या खात्यावरती करण्यात येणार आहे.

### विकासास निधी कमी

श्री वाडेगांवकर बाबा शास्त्री, रविंद्र कोठी, अध्यक्ष श्रीदत्तप्रभु भोजन संस्थान, पांचाळेश्वर, जिजा पाटील शेळके, भाऊसाहेब नाटकर, भरतराव खरात, विलास बडगे, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित आदींसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सकाळी सर्वप्रथम महानुभाव धर्म ध्वजारोहन करण्यात आले, दिप प्रज्वलानंतर धर्मसभेला प्रारंभ झाला. प्रास्ताविक महंत श्री कृष्णराज बाबा गुर्जर यांनी केले. यावेळी उद्घाटनपर बोलतांना ना. धनंजय मुंडे म्हणाले की, श्री चक्रधर स्वामी यांनी महानुभाव पंथाचे विचार आणि तत्व मराठी सारख्या लोकभाषेत मांडुन मराठी वांङ्मय खर्या अर्थाने समृद्ध केले आहे. व्यक्तीचे श्रेष्टतत्व जन्माने नव्हेतर त्याच्यातील तत्वज्ञानातुन ठरते हे सांगणारा महानुभाव पंथ आहे. महानुभाव पंथात जातीभेदाला थारा नाही. १२ व्या शतकात त्यांनी सात व्यसनांचा त्याग करण्याची शिकवण दिली मात्र आत्ताच्या काळात व्यसनांची संख्या वाढली असुन अशा समाजविघातक व्यसनांपासुन पुढच्या पिढीला दुर ठेवण्याचे काम करण्यासाठी संतमहंतांना पुढाकार घ्यावा लागेल हे सांगतांना ना. धनंजय मुंडे यांनी महायुती सरकारने श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनाच्या औचित्याने महानुभाव पंथाच्या राज्यातील पाच प्रमुख देवस्थानच्या विकासासाठी ७८ कोटी रुपयांचा निधी मंजुर केल्याचे सांगितले. यामध्ये श्रीक्षेत्र पांचाळेश्वर देवस्थान विकासासाठी ७.९० कोटी रुपये, श्री रुद्रपुर देवस्थान विकासासाठी २५ कोटी रुपये, श्रीक्षेत्र पोहीचा देव देवस्थान विकासासाठी ४.५४ कोटी रुपये, श्री जाळीचा देव देवस्थान विकासासाठी २३.९९ कोटी रुपये तर श्री गोविंदप्रभु देवस्थान विकासासाठी १८ कोटी रुपये निधी मंजुर केल्याचे त्यांनी सांगितले.महायुती सरकारने पांचाळेश्वर देवस्थान विकासासाठी निधी मंजुर केल्या बद्दल महोत्सवाचे स्वागताध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी ना. धनंजय मुंडे यांचे आभार व्यक्त केले. आपल्या स्वागतपर भाषणात त्यांनी श्री चक्रधर स्वामींच्या विचारांचे आचरण समाजाने करण्याचे गरज असल्याचे सांगितले. यावेळी सभाध्यक्ष धाराशिवकर बाबा, कळमकर बाबा, मानेकर बाबा, योगेश्वरजी उपासणी महाराज, संतोष मुनीजी शास्त्री आदींनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिल मराठे आणि सुशिल टकले यांनी केले. महोत्सवाला महिला भगिंनीसह महानुभाव पंथीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# इ-पीक पाहणी असेल तरच लाभ

## धोरण — शेतकऱ्यांना आता महसूलची वाट

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासनाने नुकतीच कापूस व सोयाबीन पिकांची नुकसानीपोटी मोबदला म्हणून पीक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रु ची मदतीची अनुदान देय आहे त्यासाठी तालुक्यात कापूस आणि सोयाबीन दोन्ही पिकांसाठी २९ ,,हजार ०८० शेतकऱ्यांना अनुदानास पात्र केले असून यामध्ये ई पीक पाहणी न केलेल्या १४ हजार ८३२ शेतकऱ्यांना वगळण्यात आले आहे मात्र या शेतकऱ्यांना आता मदतिसाठी महसूल विभागावर अवलंबून राहावे लागणार आहे दरम्यान कापूस पिकांसाठी सामायिक क्षेत्रात असलेल्या चार हजार पाचशे ८० व सोयाबीन पिकांसाठी सामायिक क्षेत्रात असलेल्या २ हजार २४४ शेतकऱ्यांचे संमती पत्र व ना हरकत घेण्याची प्रक्रिया सुरू आहे यामध्ये कापूस पिकांसाठी एकमेव क्षेत्रात असलेल्या १५ हजार ८८३व सोयाबीन अनुदान साठी ६ हजार ४७३ अशा २२ हजार ३५६ शेतकऱ्यांची माहिती शासनाकडे सादर झाली परंतु सामायिक क्षेत्रात असलेल्या सहा हजार ७२४ शेतकऱ्यांची माहिती पुरविण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने आधार कार्ड, मोबाईल क्र आणि संमती पत्र तालुका कृषी विभागात सादर करण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी केले आहे.




### कोणत्याही क्षणी मिळणार अनुदान

तालुक्यातील शेती उताऱ्यावर एकमेव नाव असलेल्या २२ हजार ३५६ शेतकऱ्यांची माहिती जमा बंदी आयुक्त पुणे यांच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे त्यामुळे या शेतकऱ्यांना खात्यावर कोणत्याही क्षणी हेक्टरी पाच हजार रु याप्रमाणे मदत जमा होणार आहे. इ पीक पाहणी न केलेल्या १४ हजार ८३२ शेतकऱ्यांना मदती साठी आता महसूल विभागाचा पर्याय शिल्लक राहिला आहे महसूल विभागाने याबाबत निर्णय घेतल्यास या इ पीक पाहणी न केलेल्या शेतकऱ्यांना आता मदतीसाठी दारे उघडणार आहे

### अनुदान घ्यायचे इंग्रजीत नाव आवश्यक

कापूस आणि सोयाबीन पिकांचे अनुदान घ्यायचे असेल तर आधार कार्ड वर इंग्रजीत नाव असणे आवश्यक करण्यात आले आहे त्यामुळे इंग्रजी नाव आधार वर असलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने सदर आधार कार्ड कृषी कार्यालयात जमा करावे असे तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले न केलेल्या शेतकऱ्यांना आता मदतीसाठी दारे उघडणार आहे

# सिरसाळ्यात जरांगे पाटलांचे स्वागत



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी येथील घोंगडी बैठकीला जात असतांना सिरसाळ्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकात मनोज जरांगे पाटील यांच्या स्वागताचे आयोजन करण्यात आले होते . दुपारी १२/ १ च्या दरम्यान मनोज जरांगे पाटील सिरसाळ्यात येताच जेसीबी द्वारे पुष्प वृष्टी करुन क्रेन च्या भव्य दिव्य हाराने स्वागत, सत्कार करण्यात आला, सिरसाळ्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात परिसरातील मराठा समाज हजारोंच्या संख्येने उपस्थित होता. मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषना देण्यात आल्या,पुढे परळी च्या घोंगडी नियोजित बैठकीसाठी कान्नापूर, बोधेगाव, नागापूर, टोकवाडी ह्या मार्गे पाटिल यांचा ताफा मार्गस्थ झाला .

### धनगर समाजाच्या वतिने सत्कार

सिरसाळ्यात मनोज जरांगे पाटील येताच धनगर समाज बांधवाच्या वतिने परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उप सभापती बाबासाहेब काळे यांनी भंडारा उधळत व पाटिल यांच्या माथ्यावर वर भंडारा लावत पुष्पहाराने त्यांचे स्वागत केले . दरम्यान अनेक मुस्लिम बांधव देखील ह्या स्वागत/सत्कार कार्यक्रमास उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धा

## क्रीडा:गणेश विद्यालयाच्या खेळाडूंची बाजी



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनाकडून घेण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धा नुकत्याच आष्टीत संपन्न झाल्या. या स्पर्धेत श्री गणेश विद्यालयाच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करुन बाजी मारली.

आष्टी येथील श्री गणेश विद्यालयातील मुले व मुलींचा संघ सतरा वर्षे वयोगटातील या स्पर्धेत सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला तर मुलांच्या संघ उपविजेता ठरला. मुलांच्या या यशाबद्दल श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती सुमनबाई थेटे, सचिव पोपटराव खाडे, भाऊसाहेब कोकणे, मधुकरराव वांढरे, महेश सावंत, राजकुमार थेटे, संस्थेचे संचालक तथा मुख्याध्यापक रमेशसिंह देसुरकर, जोतिराम कोकणे, रविकांत तरटे, संस्थेचे सर्व संचालक, पर्यवेक्षक अशोक गाडेकर क्रीडा शिक्षिका स्वाती चौधरी, पोपटराव घुले, संजयकुमार थेटे यांच्यासह शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पैठणला अतिवृष्टीची आढावा बैठक!

## तत्परता: आदित्य ठाकरेंच्या दौऱ्यानंतर प्रशासन कामाला

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या पिक नुकसानीच्या पाहणी दौऱ्यानंतर पैठण प्रशासन कामाला लागले आहे. महसूल, कृषी व अन्य विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी अतिवृष्टी आढावा बैठकीतून कर्मचाऱ्यांना पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.पैठण पंचायत समितीच्या सभागृहात तहसीलदार चव्हाण यांच्या मुख्य उपस्थिती बैठक घेण्यात आली.तालुक्यातील बारा महसूल मंडळात तीन दिवस संततधार पाऊस पडला,अतिवृष्टी झाली.तुर व कपाशीसह फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना नेते आदित्य ठाकरे,शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पाचोड शिवारातील पीक नुकसानीची पाहणी करून तहसीलदार चव्हाण,व गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड यांच्याशी चर्चा करून तत्काळ पंचनामे करून भरपाई द्यायलाच हवी अशा सूचना केल्या होत्या.



या पार्श्वभूमीवर सदर बैठकीत तहसीलदार सारंग चव्हाण यांनी सूचना केली की, अधिकाऱ्यांनी बैठकीत नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे वेगाने करावे जेणेकरून नुकसान भरपाई वेळेवर देता येईल. यावेळी गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक,रामकृष्ण पाटील, पंचायत समितीचे प्रशासकीय अधिकारी प्रमुख किशोर निकम, पाणीपुरवठा विभाग प्रमुख राजेश कांबळे, विस्तार अधिकारी(कृषी) नागेश निराधार, सागर डोईफोडे,ईश्वर सोमवंशी, संजय पवार,खंडू विर, रजनीकांत पोकळे,राजू गावडे ,हर्षद गोपनारायण, अमोल भागवत, अरुण डोंगरे , सचिन डिघूळे,बाळकृष्ण गव्हाणे, यशवंत चौधरी,व्हि.बी. वाघमारे, दीपक शिरसागर, आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तेच खरे सुखी असतात -भिक्खू धम्मशील थेरो

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माणसाचे माणसा सोबत असलेले माणुसकीचे नाते हाच बुद्ध धम्माचा केंद्रबिंदू आहे, म्हणून माणूस असाल तर माणसा सारखे वागले पाहिजे.जी माणसे माणसा सोबत उचित व्यवहार करतात तीच माणसे खरी सुखी असतात.समस्त मानव जातीला मनुष्यत्व प्राप्ती साठी बुद्ध धम्मा शिवाय पर्याय नाही.असे प्रतिपादन आपल्या साप्ताहिक प्रवचनात पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी केले.



सदधम्म सेवा संघाच्या वतीने श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी वसाहत येथे साप्ताहिक धम्मदेसनेच्या प्रवचन मालिकेत दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी पू. भिक्खू धम्मशील थेरो आपल्या मानवी जीवनात बुद्ध धम्माचे महत्त्व या विषयावरील प्रवचन मालिकेत पहिले पुष्प गुंफताना बोलत होते. पुढे बोलताना भिक्खू म्हणाले की, बुद्धाचा धम्म हा बहुआयामी असून माणसाचे मंगल होण्यासाठी सर्वांगीण मार्ग सांगतो. मानवी जीवनाचा उत्कर्ष बुद्ध धम्मातच असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २१ वर्षाच्या काळात विविध धर्माच्या अभ्यासानंतर बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला.धम्म मनोरंजनाचा नाही तर, धम्मात नीतीमतेला स्थान आहे. धम्म म्हणजे नीती आणि नीती म्हणजे धम्म आहे. इथे मनाला विचारांचा आहार दिला जातो. आपले वर्तन सुधारायचे असेल तर केवळ मनोरंजन करून जमणार नाही. खरा धम्मरस समजून घ्यावा लागेल. अर्थात धम्माचा उद्देश समजून घ्यावे लागेल. यापैकी पहिला उद्देश माणसाने मनुष्यत्व प्राप्ती करून घेणे आहे. माणूस असाल तर माणसा सारखे वागा केवळ माणसासारखे दिसणे दिसणे अपेक्षित नाही. माणसाने जनावरासारखे वर्तन करू नये. असे दुर्गुण नष्ट करून माणसाने माणसासोबत असलेल माणुसकीचे नाते जपणे गरजेचे आहे.आणि हीच बुद्ध धम्माची खरी शिकवण आहे. माणसातील पशुत्व नाहीसे करणारे औषध म्हणजे बुद्ध धम्म होय.आजच्या पूजेचे यजमान लताताई मथुरादास बनसोडे आणि ज्योतीताई तेजसकुमार बनसोडे त्यांच्या वतीने उपस्थितांना भोजनदान देण्यात आले.

प्रसंगी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक कणके यांचा सपत्नीक तर, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे शिवाजी धाईजे, वसंतराव जावळे, माजी नगरसेवक सचिन डोंगरे, माजी जि .प . समाज कल्याण सभापती गयाताई आव्हाड,वंचित आघाडीचे धम्मानंद साळवे,अंकुश जाधव,पूजेचे यजमान बनसोडे परिवार यांचा सद् धम्म सेवा संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड दशरथ मकसरे यांनी केले तर,आभार सदाशिव भालेराव यांनी मानले.

या वेळी सद् धम्म सेवा संघाचे अरुण नाकलगावकर, श्यामराव वाघमारे, भगवानराव सातपुते, पांडुरंग जाधव, रविकांत उघडे, सोपानराव उजगरे, एम.बी.चांदमारे,

जी एन घनगाव, वाल्हाबाई टाकणखार, लिलाबाई उजगरे, हे उपस्थित होते. तर राजश्री शाहू शिक्षक पथसंस्थेचे अध्यक्ष कपिल डोंगरे, मनीषा सिद्धार्थ ढवळे, शांताबाई साळवे, सुशीलाताई चांदमारे, पुनमताई धाईजे,दीपक भालेराव,बबनराव खोपे,विलास साळवे,राजरत्न खळगे,मनोरमाताई सोनवणे,आशाताई शिरसट, लक्ष्मणराव बनसोडे, गोविंदराव टाकणखार,नवनाथ गायकवाड, प्रा.संजय बागुल,अनिताताई वाघमारे,मीरा वाघमारे,कमलबाई श्रीमंतराव डोंगरे,सुधामती जावळे,इत्यादी बौद्ध उपासक उपासिका माजलगाव शहर आणि ग्रामीण भागातून या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# सोयगाव आनंदाचा शिधा ठप्प

## बोंबला:पुरवठा विभागात अधिकारीच नाही

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शासनाने गणेशोत्सव काळात शिधा पत्रिकधारकांना शंभर रुपयात आनंदाचा शिधा यामध्ये सहा वस्तू देण्यात येणार होता, परंतु सोयगाव तहसील कार्यालयात महिनाभरापासून पुरवठा अधिकारीच नसल्याने अद्यापही नियातन पाठविले नसल्याने सोयगावचा आनंदाचा शिधा गोंधळत पडला आहे

सोयगाव तालुक्यात २३ हजार ५६४ शिधापत्रिका धारक कुटुंब आहे यांना मैदा,रवा,तेल,साखर,डाळ पोहे आशा सहा वस्तू मिळणार आहे परंतु तालुक्यातील लाभार्थ्यांना अद्यापही हा आनंदाचा शिधा मिळालेला नाही रेशन दुकानात अद्यापही आनंदाचा शिधा बाबत कोणतीही माहिती कार्ड धारकांना दिली जात नाही दरम्यान सोयगाव तहसील कार्यालयात पुरवठा अधिकारी नायब तहसीलदार पद रिक्त आहे तात्पुरता महसूल एकचे नायब तहसिलदार संभाजी थोटे यांना पदभार दिला आहे.परंतु पुरवठा विभागात पुरवठा अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहे त्यामुळे गणेशोत्सव चा आनंदाचा शिधा अद्याप लाभार्थ्यांना मिळालेला नाही.

## अध्यात्मिक — कोणत्याही ऋतूत सारखे तापमान

# रुद्रेश्वरच्या गणेश मंदिरात भाविकांची गर्दी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरापासून अवघ्या ७ किलोमीटर अंतरावर अजिंठा पर्वत रांगेत अजिंठा लेणीच्या पाठीमागील डोंगरात शेकडो वर्षांपूर्वीचे पुरातन जागृत रुद्रेश्वर देवस्थान असून हे मंदीर सोयगाव पासून गलवाडा, वेताळवाडी मार्गे ७ किलोमीटर अंतरावर पूर्वेस आहे या मंदिराचा शोध अनेक वर्षांपूर्वी गुरे ढोरे राखणाऱ्या गोराख्यांनी लावला आहे मंदिरावरून जवळ दोनशे फूट वरून पडणारा धबधबा डोळ्याची पारने फेडतो मंदिराच्या समोर साधारण ३०÷ ३५ असे भव्य कुंड आहे या कुंडाची खोली फूट खोल आहे मंदिरात प्रवेश केल्याबरोबर समोर महाकाय अशा ६ फूट उंच व ३ फूट रुंद शेंदूर फासलेली आकर्षक शिंदुरात्मक श्री गणेशाची कोरीव मूर्ती डोळ्यांचे पारणे फेडते श्री गणेशाच्या मूर्ती शेजारी रिद्धी, सिद्धी अशा दोन्ही छोट्या मूर्ती आहे शिंदुरात्मक गणपतीच्या उजव्या बाजूस खडकामध्ये कालभैरव



डाव्या बाजूने नरसिंहाची कोरिव मूर्ती आहे मंदिराच्या पश्चिम बाजूस साडेतीन फूट लांब व दोन फूट रुंद , अडीच फूट उंच भव्य अशी नंदी मूर्ती आहे या मूर्तीच्या उत्तरेस महाकाय असे स्वयंभू शिवलिंग म्हणजेच श्री रुद्रेश्वर आहे.

या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही ऋतूत सारखे तापमान राहते मंदिरात जेव्हा जागरणासाठी मुक्काम करण्याची वेळ येते त्यावेळेस शांततेत आपोआप तुम्हाला तबला व पेटी व घुंगराचा गोड आवाज आणि चाहूल लागते. अशी अख्यायिका आहे. २ किलोमीटर उंच डोंगर चढल्यावर डोंगर दर्याच्या मधोमध कोरीव गणेश मंदिर तुमचा थकवा पळवून लावतो. या मंदिराची रचना अशा तऱ्हेने आहे की, मंदिरातून पश्चिम बाजूला उंच डोंगर, दरी आहेत. मंदिराच्या साक्षात्कारा बद्दल अनेक भक्तांचे व्यक्तिगत अनुभव आहे मंदिरात सोमवारी सकाळी चार वाजे पासुन अनेक वर्षांपासून दर्शन व पूजा पाठ करण्यासाठी येतात परंतु इतक्या दाट जंगलातून वाट काढून देखील हिंस्र प्राण्यांपासून किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे भक्तांना कोणतेही नुकसान झाले नाही. गणेशोत्सव व चतुर्थीच्या दिवशी येथे नित्य दर्शन करणाऱ्या भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात व ज्यांच्या समस्यांचे निराकरण झालेले आहे असे अनेक भक्तांचे अनुभव आहे गलवाडा वेताळवाडी हालदा दाखला सोयगाव शेंदुर्णी आधी परिसरातील भाविक डोंगर पायथ्याशी सप्ताह व इतर धार्मिक कार्यक्रम नित्य करीत असतात.

गणपतीचे आवडते मंगळवार, चतुर्थीच्या दिवशी या ठिकाणी भक्तांची रेलचेल बघायला मिळते. गलवाडा येथूननित्य दर्शनासाठी जाणारे भक्त धनराज औरंगे हे सांगतात की, भक्तांची अपार श्रद्धा असलेल्या मंदिराला अनेक वर्षांपासून खानदेश, मराठवाडा, विदर्भ व मध्यप्रदेश येथून हजारो लाखोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असून पुरातन ख्याती असलेले हे मंदिर व परिसर विकास कामांपासून वंचित आहे. मंदिर परिसरात असलेल्या पुरातन वस्तूंची संवर्धन होणे गरजेचे आहे पुरातन मंदिर असूनही येथे असा भरून निधी देण्यात आलेला नाही अशी खंत यावेळी भाविकांनी बोलून दाखवली.

# बालकांचे मानसिक आरोग्य जपा

## सुषमा माने : पिंपरी येथे पोषण सप्ताह



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पिंपरी बुद्रुक येथे श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय गृहविज्ञान विभाग आयोजित पोषण महा निमित्त उद्घाटन कार्यक्रमा प्रसंगी त्या बोलत होत्या.पोषण सप्ताहाच्या निमित्ताने बालकांचे आरोग्य व सर्वांगीण विकास या विषयावर बोलताना त्यापुढे म्हणाल्या मुलांना सुदृढ, निरोगी बनवण्याची जबाबदारी ही पालकांची आहे. पालकत्व म्हणजे फक्त मूल जन्माला घालणे नसून सुजान नागरिक बनवण्याची नैतिक जिम्मेदारी आहे. त्या अनुषंगाने मुलांच्या सर्वांगीन विकासवर भर द्यावा. मुलांना सुदृढ बनवण्यासाठी आहाराच्या संदर्भात जनजागृती करणे आणि त्यासोबत समाजाचं सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी बालकांच्या मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले . यावेळी व्यासपीठावर उपस्थित कार्यक्रमाच्या अध्यक्ष रामकवर अक्का ढिसले, कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी प्रियंका काळे, या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे प्रस्ताविक आयोजक प्रा.डॉ.उषा माने यांनी केले. आभार प्रियंका काळे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाची माजी विद्यार्थी पल्लवी माने हीने प्रयत्न केले. या कार्यक्रम प्रसंगी गावातील २२ महिलांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# बीएसएफवर पाकिस्तानच्या बकऱ्या चारण्याची वेळ!

## पाकिस्तानला बकऱ्यांबाबत अल्टिमेटम



**जयपूर :** राजस्थानातील बाडमेरलगत पाक सीमेवरील सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) जवानांवर पाकिस्तानच्या बकऱ्या चारण्याची वेळ ओढवली आहे. बकऱ्यांची संख्याही थोडीथोडकी नाही, तर ३०० वर आहे. या बकऱ्यांनी पाक सीमेपलीकडून कुंपणाच्या मोकळया जागेतून भारतीय हद्दीत घुसखोरी केली. २० जुलैपासून भारतीय बीएसएफचे जवान या बकऱ्या सांभाळत आहेत. प्रकरण घुसखोरीचे असल्याने परस्पर काही करताही येत नाही. पाकिस्तानी रेंजर्सनाही ही बाब बीएसएफने कळवली. दोन महिने होत आले; पण पाककडून या बकऱ्या परत नेण्याबाबत कुठल्याही हालचाली नाहीत. बकऱ्यांचे काय करावे, हा प्रश्न सीमा सुरक्षा दलाला पडला आहे.

# दिल्लीतील महाराष्ट्र सदनात गणपती बाप्पाचा जयघोष

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली :** ढोल-ताशांवरील ठेका आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने कोपर्निकस मार्ग स्थित महाराष्ट्र सदन दुमदुमले. लाडक्या बाप्पांच्या आगमनासाठी गणेशभक्तांनी एकच गर्दी केली होती. गणरायाच्या आगमनासाठी असेच जल्लोषपूर्ण व भक्तिमय वातावरण संपूर्ण दिल्ली व राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात दिसून आले. महाराष्ट्र सदनातील सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या वतीने कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेच दिल्लीच्या वेगवेगळया भागातील विविध गणेश मंडळांतही उत्साहाच्या वातावरणात शनिवारी गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

# गुंजी परिसरात भात पिकावर किडीचा प्रादुर्भाव

**गुंजी :** गुंजी (ता. खानापूर) परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या भात पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाल्याने येथील शेतकरीवर्ग चिंतातूर झाला आहे. या किडीमुळे भात पिकांची पाने कुरतडली जात असून पाने पांढरी पडत आहेत. त्यामुळे भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. काही ठिकाणी पाने गुंडाळणाऱ्या किडीचा प्रभाव दिसून येत आहे. या भागातील

### शेतकरी वर्ग चिंतातूर

बऱ्याच शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने मे अखेरीस पेरणी केली आहे. अशा शेतकऱ्यांची भात पिके जोमात आहेत. मात्र, काही शेतकऱ्यांनी उशिरा भात लागवड केली आहे. अशा भात पिकांवर किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याचे शेतकऱ्यांतून सांगण्यात येत आहे.



**वॉशिंग्टन : अमेरिकेतील लुईझियानामधील लेक चार्ल्स येथे असलेल्या २२ मजली हर्ट्झ टॉवरवर सरकारने बॉम्बस्फोट केला आहे. ही एकेकाळी शहराची प्रतिष्ठित इमारत होती. पण आता ती धुळीत हरवली. २०२० मध्ये लॉरा आणि डेल्टा या चक्रीवादळांमुळे इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तेव्हापासून ते रिक्त होते.**

# रिलायन्स वन्यजीव केंद्र करणार चित्त्यांचे रक्षण!

## कुनोतील मृत्यूनंतर केंद्र सरकारचे पाऊल



**कुनो :** मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात गेल्या वर्षी अवघ्या एका महिन्यात तीन चित्त्यांचा मृत्यू झाल्यानंतर, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने मे २०२३ मध्ये आरोग्य निरीक्षण प्रोटोकॉलची समीक्षा करण्यासाठी गुजरातस्थित रिलायन्स वन्यजीव केंद्राच्या तज्ज्ञांची मदत घेण्यात आली होती. अधिकृत नोंदीवरून ही माहिती मिळाली आहे. राष्ट्रीय संवर्धन प्राधिकरणाचे (एनटीसीए) सहायक वन महानिरीक्षक अभिषेक कुमार यांनी ११ मे २०२३ रोजी जामनगर येथील रिलायन्स इंडस्ट्रीजच्या ग्रीन्स झूलॉजिकल रेस्क्यू अ‍ॅण्ड रिहॅबिलिटेशन सेंटरच्या (जीझेडआरआरसी) सीईओंना पत्र लिहून कुनोला तज्ज्ञांचे पथक पाठविण्याची विनंती केली होती.

# 'आदमखोर' हत्तीने 30 दिवसांत 5 जणांना चिरडले

वृत्तसंस्था



**कोरबा :** छत्तीसगडमध्ये गेल्या महिन्याभरात आदमखोर व बिथरलेल्या हत्तीने ५ जणांना चिरडले आहे. शिवाय, दोन बैलांनाही मारले. छत्तीसगडच्या कोरबा जिल्ह्यात हत्तीने (शनिवारी) ६५ वर्षीय महिलेवर हल्ला करीत, तिला क्रूरपणे चिरडून टाकले. बाल्को जंगल रेंजजवळ बाघमारा नावाच्या गावात झालेल्या आणखी एका घटनेत याच हत्तीने दोन बैलांनाही चिरडले होते. शुक्रवारच्या मध्यरात्री याच गावाजवळच्या शेतजमिनीवर बांधलेल्या झोपडीवजा कच्च्या घरात झोपलेल्या भलाई बाई आणि त्यांच्या पतीवर हत्तीने हल्ला केला.



## राज्याच्या एकूण लोकसंख्येपेक्षा अधिक अर्ज आल्याने मुख्यमंत्र्याना चिंता

# आधारसाठी एनआरसी अनिवार्य

**दिसपूर :** आसाममध्ये आधार कार्डसाठी अर्ज करणाऱ्या सर्व नवीन अर्जदारांना १ ऑक्टोबर, २०२४ पासून त्यांचा राष्ट्रीय नागरिक नोंदणी (NRC) अर्ज क्रमांक (ARN) जाहीर करणे अनिवार्य असल्याचे आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी म्हटले आहे. राज्यात अवैध स्थलांतरितांचा प्रवेश रोखण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. २०२३ च्या सुरुवातीपासून आतापर्यंत आसाममध्ये १५६ अवैध घुसखोरांची ओळख पटली आहे. यात गेल्या जुलै आणि ऑगस्टमध्ये बांगलादेशातून आलेल्या तब्बल २० जणांचा देखील समावेश आहे.

**निर्धारित नियमांतून सूट :** ज्यांचे बायोमेट्रिक्स एनआरसी प्रक्रियेदरम्यान लॉक झाले होते त्या ९.५५ लाख लोकांना हा नियम लागू होणार नाही. मात्र चहाच्या बागेत काम करणाऱ्या लोकांना या नियमातून सूट देण्यात आली आहे. बेकायदेशीर स्थलांतरितांची ओळख पटवणे: गेल्या काही दिवसांत बेकायदेशीर स्थलांतरितांची संख्या वाढली असून, त्यांची ओळख पटवून त्यांना परत पाठवण्याची प्रक्रिया जलद केली जाईल असे मुख्यमंत्री सरमा म्हणाले.

### सीमेवरील सुरक्षा सुधारणार!

बांगलादेशातून येणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांना रोखण्यासाठी सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) सीमेवर कडक नजर ठेवत आहे आणि भविष्यात सुरक्षा व्यवस्था आणखी कडक केली जाईल. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी घुसखोरांबाबत अधिक माहिती देताना तपास यंत्रणांनी केलेल्या पडताळणीमधून धक्कादायक आकडे उघडकीस आल्याचे सांगितले. वर्षांच्या सुरुवातीपासून, आसाममध्ये आतापर्यंत ५४ अवैध स्थलांतरितांची ओळख पटली आहे, त्यापैकी ४५ लोकांना त्यांच्या देशात परत पाठवण्यात आले आहे. तर करीमगंजमध्ये ९ जणांना अटक करण्यात आली. करीमगंजमध्ये सर्वाधिक ४८ , बोंगाईगावमध्ये ४ आणि हाफलांग जीआरपी आणि धुबरी जिल्ह्यात प्रत्येकी एक घुसखोर सापडला.

# चीनची राजधानी बीजिंगला मुंबई शहराने टाकले मागे!

वृत्तसंस्था



**नवी मुंबई :** देशाची आर्थिक राजधानी मुंबईतून एक महत्वाची बातमी समोर येत आहे. मुंबई शहराच्या शिरपेचात मनाचा तुरा रोवला गेला आहे. मुंबई हे आता जगातील सर्वात जास्त अब्जाधिश असलेले शहर बनले आहे. हुरुन इंडिया रिच लिस्ट २०२४ च्या अहवालानुसार मुंबईने आता चीनची राजधानी बीजिंगलाही मागे टाकले आहे. यापूर्वी बीजिंग हे जगातील सर्वात जास्त अब्जाधिश असणाऱ्यांचे शहर होते. आता मुंबईनं बीजिंगला मागे टाकत ही बाजी मारली आहे.

दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, बीजिंगमध्ये वर्षभरात अब्जाधिशांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. जवळपास २८ टक्क्यांची घट झाली आहे. मागील एका वर्षात मुंबईतील श्रीमंतामध्ये ५८ नव्या अब्जाधिशांची भर पडली आहे. यामुळे शहराची एकूण संपत्ती ही ४७ टक्क्यांनी वाढली आहे. अलिकडच्या काळात मुंबईत अब्जाधिश असणाऱ्या लोकांच्या संख्येत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे मुंबई जगाती सर्वात जास्त अब्जाधिश असणाऱ्या लोकांचे शहर झाले आहे. यामुळे मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून जगात नावलौकीक झाला आहे.

# पाकच्या सागरी क्षेत्रात मिळाला कच्च्या तेलाचा साठा

**कराची :** पाकिस्तानच्या सागरी क्षेत्रात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचा मोठा साठा मिळाला आहे. या साठ्याच्या उत्खननातून देशाची आर्थिक स्थिती बदलू शकते असे मानले जात आहे. कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू साठ्याच्या अस्तित्वाच्या पुष्टीसाठी पाकिस्तानने एका मित्र देशाच्या सहकार्यातून तीन वर्षांपर्यंत सर्वेक्षण केले होते. भौगोलिक सर्वेक्षणामुळे पाकिस्तानला साठ्याच्या स्थानाची ओळख पटविण्यास मदत मिळाली आहे. संबंधित विभागांनी सरकारला पाकिस्तानी सागरी क्षेत्रातील कच्च्या तेलाच्या साठ्यासंबंधी माहिती दिली आहे. या साठ्याचे उत्खनन करण्यासाठी आता सरकारकडून संशोधन प्रस्ताव मागविले जात आहेत.

# अबुधाबीचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन झायेद भारत दौऱ्यावर!

वृत्तसंस्था



**नवी दिल्ली:** संयुक्त अरब अमीरातीचे (यूएई) क्राऊन प्रिन्स शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान पुढील आठवड्यात २ दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. काही महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना भारतभेटीचे निमंत्रण दिले होते. अबुधाबीचे क्राउन प्रिन्स शेख खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांनी पंतप्रधान मोदींचे निमंत्रण स्वीकारले आहे. आता ते ९-१० सप्टेंबर रोजी भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत.

अबुधाबीचे क्राऊन प्रिन्स म्हणून यूएईच्या राष्ट्राध्यक्षांची ही पहिलीच भारत भेट असेल. त्यांच्यासोबत यूएई सरकारचे अनेक मंत्री आणि एक व्यावसायिक शिष्टमंडळही भारतात येत आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ९ सप्टेंबर रोजी अबू धाबीचे राष्ट्रपती क्राउन प्रिन्स नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. यादरम्यान ते द्विपक्षीय सहकार्याच्या व्यापक क्षेत्रांवर चर्चा करतील. पंतप्रधान मोदींची भेट घेतल्यानंतर ते भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत. महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहण्यासाठी ते राजघाटावरही जाणार आहेत.

# पाकिस्तानचा ज्यूंवर हल्ल्याचा कट उघड!

### अमेरिकेतील मोठा घातपात टळला

वृत्तसंस्था



**वॉशिंग्टन :** कॅनडात राहणाऱ्या एका पाकिस्तानी नागरिकाला अमेरिकेत दहशतवादी हल्ला करण्याचा कट रचल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानी नागरिकाने न्यूयॉर्क शहरात ज्यूंवर हल्ला करण्याचा कट रचला होता अशी माहिती अमेरिकेच्या न्याय विभागाने दिली आहे. २० वर्षीय मुहम्मद शाहजेब खान उर्फ शाहजेब जादूनला अटक करण्यात आली आहे.

ॲटर्नी जनरल मेरिक गारलँड यांनी यासंबंधी माहिती दिली आहे. आरोपीने ७ ऑक्टोबरच्या सुमारास न्यूयॉर्क शहरात दहशतवादी हल्ला करण्याचा कट रचला होता, इस्लामिक स्टेटच्या नावाखाली अधिकाधिक ज्यूंचे शिरकाण करण्याचे त्याचे लक्ष्य होते. ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवरील हमासच्या दहशतवादी हल्ल्याला एक वर्ष पूर्ण होणार आहे. एफबीआयचा तपास आणि कॅनडाच्या कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या कारवाईमुळे आरोपीला ताब्यात घेण्यात आल्याचे गारलँड यांनी सांगितले आहे. शाहजेबने न्यूयॉर्कचा प्रवास करणे आणि ७ ऑक्टोबर रोजी ब्रुकलिन येथे एका ज्यू केंद्रावर इस्लामिक स्टेटच्या समर्थनार्थ गोळीबार करण्याचा कट रचला होता. शाहजेबने स्वतःच्या कटाचा खुलासा काही लोकांसमोर केला होता. परंतु तो याप्रकरणी ज्या लोकांसोबत बोलत होता, ते अंडरकव्हर एजंट होते. शाहजेबला कॅनडाच्या अधिकाऱ्यांनी अमेरिका-कॅनडाच्या सीमेपासून सुमारे १९ किलोमीटर अंतरावरील आर्म्सटाउन शहरात अटक केली आहे.

# गायक कन्हैया मित्तल काँग्रेसच्या वाटेवर; भाजपाला बसणार धक्का



**चंदीगढ :** हरियाणा विधानसभा निवडणुकांपूर्वी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सुप्रसिद्ध गायक कन्हैया मित्तल मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे. लवकरच काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचे कन्हैया मित्तलने यांनी सांगितले आहे. हरियाणाच्या पंचकुला मतदारसंघातून कन्हैया मित्तल यांना भाजपकडून तिकीट मिळण्याची अपेक्षा होती, मात्र भाजपने जुने नेते ज्ञानचंद यांना येथून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे कन्हैया मित्तल भाजपवर नाराज असल्याची चर्चा होत आहे.

२०२२ मध्ये झालेल्या यूपी विधानसभा निवडणुकीदरम्यान कन्हैयाचे 'जो राम को लाए हैं, हम उनको लायेंगे' हे गाणं खूप प्रसिद्ध झाले. यानंतर कन्हैया मित्तलने मुख्यमंत्री योगी यांचीही भेट घेतली आणि त्यांनी सार्वजनिक मंचावरून पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले.

# युक्रेनला मिळणार नाहीत दीर्घ पल्ल्याचे शस्त्रास्त्र!

वृत्तसंस्था

**बर्लिन :** युक्रेनची दीर्घ पल्ल्यापर्यंत मारा करणाऱ्या शस्त्रास्त्रांची मागणी अमेरिकेने फेटाळली आहे. दीर्घ पल्ल्यापर्यंत मारा करणारी शस्त्रास्त्रे (क्षेपणास्त्रे आणि लढाऊ विमाने) युक्रेन युद्धाचे चित्र बदलण्यास यशस्वी ठरणार नाहीत. याचमुळे त्यांना युक्रेनला देण्याचा

### अमेरिकेने मागणी फेटाळली

कुठलाच लाभ होणार नसल्याचे उद्गार अमेरिकेचे संरक्षणमंत्री लॉयड ऑस्टिन यांनी काढले आहेत.

यापूर्वी युक्रेनचे अध्यक्ष वोल्दोमिर झेलेंस्की यांनी रशियावर हल्ला करण्यासाठी दीर्घ पल्ल्याच्या शस्त्रास्त्रांची मागणी केली होती. तर दुसरीकडे अमेरिकेने युक्रेनला २५ कोटी डॉलर्सची नवे शस्त्रास्त्रे देण्याची घोषणा केली आहे. रशियाचा लाल रेषेच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करत सहकारी देशांनी आमच्या सैन्याला दीर्घ पल्ल्याची शस्त्रास्त्रे पुरविण्याची गरज आहे. या शस्त्रास्त्रांद्वारे युक्रेनचे सैन्य रशियाच्या अंतर्गत



भागांमध्ये हल्ले करणार आहे. यामुळे रशियावर युद्ध संपविण्यासाठी दबाव येणार असल्याचे झेलेंस्की यांनी म्हटले होते. जर्मनीच्या रॅम्स्टीन वायुतळावर अमेरिकेकडून युक्रेनच्या सहकारी देशांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. याच बैठकीत झेलेंस्की यांनी भाग घेतला आहे.

# मडगाव ते पनवेल मार्गावर विशेष गाडी

**नवी मुंबई :** गणेश उत्सव दरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी कोकण रेल्वे मार्गावर मडगाव जंक्शन ते पनवेल दरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गाडी क्रमांक ०१४२८ /०१४२७ मडगाव जंक्शन - पनवेल - मडगाव जंक्शन विशेष गाड्या सोडण्यात येत आहेत.

# सायबेरियातील रहस्यमय खड्ड्याचा वाढतोय आकार!

**सायबेरिया:** सायबेरियात एक विशाल खड्डा असून त्याचा आकार सातत्याने वाढत आहे. याचा आकार एखाद्या स्टिंग रे, हॉर्सशू क्रॅब किंवा विशालकाय टॅडपोलसारखा दिसतो. हा खड्डा पूर्वी अत्यंत छोटा होता, १९६० मध्ये पहिल्यांदा याचे उपग्रहाद्वारे छायाचित्र काढण्यात आले होते. परंतु आता खड्डा अत्यंत विशाल आकाराचा झाला आहे. तसेच याचा आकार सातत्याने फैलावत चालला असून माती खचत चालली आहे. आता या क्रेटरच्या आत पर्वत आणि खोरे तयार होत आहेत. हा सर्व बदल उपग्रहीय छायाचित्रांमध्ये स्पष्ट दिसतो. याचे नाव द बाटागे क्रेटर आहे. या खड्ड्याचा आकार सातत्याने का वाढतोय असा प्रश्न वैज्ञानिकांना सतावू लागला आहे.



**नवी मुंबई : नवसाला पावणारा बाप्पा अशी ओळख असलेल्या लालबागचा राजाच्या दर्शनासाठी केवळ मुंबईच नव्हे तर, राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक येत असतात. या राजाच्या दरबारी सेलिब्रिटीही हजेरी लावतात. राज्यासह देशभरात शनिवारी लाडक्या बाप्पाचे आगमन झाले. या पहिल्याच दिवशी लालबागचा राजाच्या दर्शनासाठी गणेशभक्तांनी अलोट गर्दी केली होती.**

# ग्रीसच्या वोलोस शहरात मृत माशांमुळे आणीबाणी

वृत्तसंस्था

**अथेन्स:** ग्रीसच्या वोलोस शहरात मृत माशांचे अवशेष सडू लागल्याने अत्यंत भयानक दुर्गंधी पसरली आहे. तसेच माशांच्या अशाप्रकारच्या मृत्यूमुळे देशात आणीबाणी घोषित करावी लागली आहे. हवामान बदलामुळे तसेच तीव्र चक्रीवादळ आणि पूरामुळे गोड्या पाण्यातील मासे समुद्रात वाहून आले आणि तेथे ते जिवंत राहू शकले नसल्याचे मानले जात आहे. वोलोस या सुंदर पर्यटनस्थळाच्या आसपासच्या पाण्यातून १०० टनापेक्षा अधिक वजनाचे मृत मासे

वोलोस शहरात एकाच दिवसात ५७ टनापेक्षा अधिक मृत माशांना बाहेर काढण्यात आले असून सफाईचे काम अनेक दिवसांपर्यंत चालणार आहे. स्थानिक व्यवसाय, खासकरून पर्यटन उद्योगाला मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. काही व्यवसायांनी तर स्वतःची उलाढाल ८० टक्क्यांपर्यंत खालावल्याचे जाहीर केले आहे.

### पर्यटन क्षेत्राला बसला फटका

यंदा सरोवरातील पाणी कमी झाल्याने मासे वोलोस बंदराच्या दिशेने आले, गोड्या पाण्यातील हे मासे खारे पाण्यात अधिक काळ जिवंत राहू शकले नाहीत. अधिकारी आता मृत माशांना हटविण्याचे काम करत आहेत. तर अधिक मासे समुद्रात पोहोचू नयेत म्हणून नदीच्या मुखावर जाळे लावण्यात आले आहे. मागील वर्षी आलेल्या पूरानंतर या भागात येणाऱ्या पर्यटकांची संख्या सुमारे ८० टक्क्यांनी कमी झाली आहे. मृत माशांमुळे ही समस्या आमच्यासाठी अत्यंत घातक ठरणार असल्याचे स्थानिक संघटनेचे अध्यक्ष स्टीफनोस स्टीफानौ यांनी म्हटले आहे.

### हवामान बदलाचा परिणाम



बाहेर काढण्यात आले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या छायाचित्रे आणि व्हिडिओंमध्ये मृत मासे समुद्रात तरंगत असल्याचे आणि यामुळे पाण्याचा रंगच बदलत असल्याचे दिसून येते. मागील वर्षी थेसली क्षेत्रात आलेल्या पुरामुळे मोठे नुकसान झाले. या पुरामुळे १९६२ मध्ये कोरड्या पडलेल्या एका सरोवरात पाणी भरल्याने त्याचा आकार तीनपट वाढला होता. प्रत्यक्षात १९६२ मध्ये मलेरियाचा फैलाव रोखण्यासाठी हे सरोवर आटविण्यात आले होते. मागील वर्षी थेसलीमध्ये सुमारे २० हजार हेक्टर मैदान पाण्याखाली गेले होते. तर नद्यांमधील मासे समुद्रात वाहून गेले होते.

# गावाच्या एकीने दारुड्यांना बसला लगाम!

## निर्णय: पाटोदामध्ये आडवी बाटली मतदान

रत्नदीप सरवदे/पाटोदा

अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा ममदापूर या दिनांक आठावीस आठ दोन हजार चोवीस वार गुरुवार रोजी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आलेले होते या ग्रामसभेला गावातील सर्व ग्रामस्थांनी विशेष उपस्थिती दाखवली होती आणि या ग्रामसभेत वेगवेगळे ठराव ही पास करण्यात आलेले होते आणि नवीन कामाची ही यादी करण्यात आलेली होती

विशेषत म्हणजे आंबेजोगाई तालुक्यातील एकेकाळी शिक्षणासाठी गनले जाणारे शिक्षणामुळे तालुक्यामध्ये सर्वात पुढे असणारे आणि सरकारी नोकरीमध्ये हे सर्वात जास्त प्रमाणामध्ये नोकरीची धडपड करत असलेले गाव म्हणून पाटोदा म समजले जात होते, मात्र मागील तीस वर्षापासून गावामध्ये एकच समस्या सगळ्यात मोठी जास्त प्रमाणात बनली जात होती ते म्हणजे व्यसनी होत चाललेला सर्व पाटोद्यातील समाज यामध्ये किंबहुना शाळेतील विद्यार्थी तसेच गावातील प्रौढ नागरिक ज्येष्ठ नागरिक हे व्यसनाच्या सर्वात जास्त आहारी गेलेली दिसत आहेत आणि ते सत्य आहे व्यसनाने कितेक कुटुंब उध्वस्त झालेले दिसत आहे आणि म्हणून गावातील सर्वच ग्रामस्थांनी



ग्रामसभेला विशेष उपस्थिती दाखवली आणि आडवि बाटली मतदान ग्रामसभेमध्ये ठराव एकमताने पास झालेला आहे

गावामध्ये वाढत चाललेली व्यसन यामुळे होणारे नुकसान यामुळे राजकीय लोक याचा जास्त प्रमाणामध्ये फायदा करून घेत होते कारण राजकीय लोक हे आपल्या फायद्यासाठी आपल्या खुर्चीसाठी लहान थोर पोरांनाही बार वरती जा आणि दारू पिऊन असे फोन करून सांगत होते यामुळे गावातील सरपंच असो उपसरपंच असो किंवा माजी सरपंच असोत यांचा राजकीय स्वार्थ असल्यामुळे गावातील कित्येक विद्यार्थ्यांना व्यसनी लावण्याचे काम हे गावातील पुढाऱ्यांनी केलेले आहे कुटुंबाला बसत असल्यामुळे गावातील सर्वसामान्य कुटुंबातील लोकांनी येऊन ग्रामसभा आयोजित केली आणि आडी बाटली मतदान घेण्याचा ठराव एक मताने पास केल्यामुळे गावातील सर्व लोकांमध्ये विशेषतः महिला भगिनीमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे आणि राजकीय लोकांच्या तोंडावरती बारा वाजले दिसत आहे आडवी बाटली मतदान एक मुखाने पास झाल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये गावातून हद्दपार तर होणारच आहे शिवाय गावातील मटका गुटखा हाई बंद करण्याचा ठराव ग्रामसेवक मध्ये पारित करण्यात आलेला आहे यामुळे कुठेतरी पाटोदा महिला भगिनींनी कुठेतरी सुटकेचा श्वास घेतलेला दिसत आहे कारण अकरावी बारावी मधील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये जेवढा रस नव्हता तेवढा पिण्यामध्ये रस शक्यतो दाखवत होते आणि पीत होते आणि खरे खोटे न काही बघता काही लोक यांचा सरस उपयोग हा राजकीय स्वार्थासाठी करून घेत होते विद्यार्थी व्यसनी बनत गेल्यामुळे गावातील नोकरीचे प्रमाण अत्यल्प झालेले आहे नोकरीचे प्रमाण अत्यल्प झाल्यामुळे कुटुंबावर ती काही प्रमाणात उपासमारीची वेळ आलेली आहे मात्र गावातील आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की ज्या लोकांना पिण्याचे व्यसन लागलेले आहे ज्या विद्यार्थ्यांना पिण्याचे व्यसन लागलेले आहे ते लोक ते विद्यार्थी आज कोणत्यातरी निवडून निवडणूक प्रक्रियेची किंवा कार्यक्रमाची वाट बघत आहेत कारण राजकीय स्वार्थ डोळ्यासमोर बघत बसलेली गावातील मंडळी यांना निवडणूकच्या कार्यक्रमामध्ये विशेषतः जास्त प्रमाणात प्रमाणामध्ये महत्त्व देते आणि म्हणून गावामध्ये आडवी बाटली मतदान ठराव एकमताने पास झाल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये पाटोदा ममदापूर येथील दारू गावातून हद्दपार होणार हे नक्की आहे आणि या ठिकाणी महिला भगिनी अत्यंत सुखी व समृद्धीने राहतील अशी पाटोद्यामध्ये कुजबूज सुरू आहे पाटोद्यामध्ये जिथे बघावे तिथे दारू दारू आहे यामुळे या ठरावाला विशेष महत्त्व आहे शिक्षणापासून अत्यल्प होत चाललेला समाज अकलंता कमी होत चालल्याने खरे आणि खोटे न समजून घेतल्याने त्याची कुटुंबाची अत्यंत दयनीय अवस्था होत चाललेले आहे कारण पीत असलेला व्यक्ती त्याला त्याला ज्यांनी पाजले त्याचीच खरे धरते आणि समोरचा व्यक्ती कितीही खरे असेल तर त्याचे हा खोटेच धरतो म्हणून गावातील सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन हा ठराव पारित केल्याबद्दल ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

# कांद्याला प्रतिक्विंटल साडेचार हजाराचा भाव

## दिलासा: कांदा उत्पादक शेतकरी वर्गाकडून समाधान



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत रविवारी झालेल्या लिलावात चांगल्या दर्जेदार कांद्याला प्रतिक्विंटल चार हजार पाचशेपासून ते चार हजार सातशेपर्यंतचा भाव निघाला. मागील पंधरा दिवसांपासून उन्हाळी कांद्याच्या दरात वाढ होऊ लागल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.

आष्टी तालुक्यातील कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत उन्हाळी कांद्याचे लिलाव रविवारी पार पडले. या दिवशी बाजार समितीमध्ये सात ते आठ हजार कांद्याच्या गोण्याची आवक झाली. रविवारी झालेल्या लिलावात प्रथम दर्जाच्या गोल कांद्याला जवळपास चार हजार पाचशेपासून चार हजार सातशेपर्यंतचा प्रतिक्विंटल भाव मिळाला. क्रमांक दोनच्या कांद्याला चार हजार ते साडेचार हजार भाव, क्रमांक तीनच्या कांद्याला तीन हजार ते साडेतीन हजार तर चार क्रमांकाच्या कांद्याला अडीच ते तीन हजाराचा भाव निघाला असल्याची माहिती बाजार समितीचे सचिव हनुमंत गळगटे यांनी दिली. यंदा कांदा पिकापासून हमखास शाश्वत उत्पन्न मिळत असल्याने शेतकऱ्यांकडून कांदा उत्पादन पिकाला पसंती मिळत आहे. सध्या बाजारात कांद्याला चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गातून समाधानकारक प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# समीर काझी वक्फ बोर्डाला नवी दिशा देतील

## सलीम जहाँगीर :भाजप अल्पसंख्याक मोर्चाकडून सत्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीतील शिवसेनेच्या कोट्यातून बीड येथील समीर काझी यांची महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड झालेली आहे. अत्यंत अभ्यासू आणि अनुभवी नेतृत्व असलेले समीर काझी हे राज्य वक्फ बोर्डाला नवी दिशा देतील असा विश्वास भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी व्यक्त केला.

बीड येथील कार्यालयात राज्य वक्त बोर्डाचे अध्यक्ष ना समीर काझी यांचा भाजप अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहांगीर म्हणाले, नवनिर्वाचित वक्फ बोर्डचेअरमन ना. समीर काझी यांचे भाजपा अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे. समीरभाई यांचे आणि माझे कौटुंबिक नातेसंबंध असून आम्ही मित्र देखील आहोत. अभ्यासू, हुशार आणि चाणाक्ष असलेले समीरभाई नक्कीच



वक्फ बोर्डाला एक नवी दिशा देतील. येणाऱ्या काळात नवीन योजना कार्यान्वित करण्याचा संकल्प त्यांनी केलेला आहे. समीर काझी हे बांधकाम क्षेत्रातील एक नावाजलेले व्यक्तिमत्त्व आहे. वक्फ बोर्डाच्या कामात यापूर्वी दिरंगाई होत होती. मात्र आता या कामांना गती मिळत आहे. कर्मचारी भरतीमुळे कामे अधिक गतीने होणार असून त्यात जास्तीत जास्त सुसूत्रता येईल. मस्जिद नोंदणीसह इतरही अनेक कामे ऑनलाईन होत पान २ वर...

# परळीकरांची सेवा हा माझा धर्म

## धनंजय मुंडे : ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना मदत मंजूर

परळीपुण्यभूमी प्रतिनिधी

आज राजकारणात व समाजकारणात जो काही आहे तो केवळ आणि केवळ परळीतील जनतेच्या आशीर्वादामुळे आहे. त्यामुळे सत्ता असो नसो, परळीकरांची सेवा करणे हा माझा धर्म आणि माझं कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य मी अखेरच्या श्वासापर्यंत निभावत राहीन, असे मत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पूरग्रस्त कुटुंबियांशी संवाद साधताना व्यक्त केले आहे. परळी वैजनाथ शहरातील सरस्वती नदीला मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पूर आल्याने पुराचे पाणी काही घरांमध्ये शिरून कौटुंबिक साहित्य, कपडे, भांडी, अन्नधान्य आदींचे नुकसान झाले होते. त्यांना तात्काळ दिलासा म्हणून धान्याच्या किट देण्यात आल्या, त्याचबरोबर प्रशासनाच्या नियमानुसार तहसील कार्यालयामार्फत प्रत्येक



बाधित कुटुंबाला प्रत्येकी पाच हजार रुपये तर कृषिमंत्री धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या संस्थेच्या मार्फत तब्बल दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येत आहे.

या मदतीचे आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ३५ कुटुंबांना धनादेश स्वरूपर वितरण करण्यात आले. तर उर्वरित कुटुंबांना सोमवार व मंगळवार या दोन दिवसात घरपोच वितरण करण्यात येईल. ही मदत एकूण ५५० पेक्षा अधिक कुटुंबांना देण्यात येणार पान २ वर...

# घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही

## दिलास: पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचा शब्द

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सिल्लोड – सोयगाव तालुक्यात जवळपास सहा हजार लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली आहे. मात्र उर्वरित जे लाभार्थी राहिलेत त्यांना तीन टप्यात मंजुरी मिळणार आहे असे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी रविवारी सोयगावात सांगितले. ज्यांना घर बांधण्यासाठी स्वतःची जागा नाही, काही लाभार्थी गायरान, गावठाण मध्ये अनेक वर्षांपासून राहत आहे. अशा लाभार्थ्यांचा जागेचा प्रश्न सोडवून प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात येईल एकही पात्र लाभार्थी घटकूल



योजनेपासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही अब्दुल सत्तार यांनी दिली.प्रधानमंत्री आवास योजना टप्प्या क्र दोन अंतर्गत सोयगाव तालुक्यातील पान २ वर...

# म्हणून क्लासवन अधिकारी झालो

## सुदाम मुंडे :आदित्य शिक्षण संस्थेचे योगदान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदित्य महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी मला एमपीएससीचा 'म' देखील माहित नव्हता. २०१३ साली आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेव्हा महाविद्यालयात शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतली जात होती. मी देखील महाविद्यालयात एमपीएससीची तयारी सुरू केली. महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्याकडून मला एमपीएससी बद्दल सखोल माहिती आणि मार्गदर्शन मिळाले अन तेथेच मी अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. आज आदित्य शिक्षण संस्थेमुळेच मी क्लासवन अधिकारी झालो असे असे प्रतिपादन सहाय्यक वन संरक्षक क्लासवन अधिकारी सुद्धा मुंडे यांनी केले.



आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रासह स्पर्धा परीक्षा बद्दल मार्गदर्शन करून येथे क्लासेस घेतले जातात. महाविद्यालयात शिक्षण घेताना केवळ पुस्तकी ज्ञान न देता भावी आयुष्यात सुसंस्कृत अधिकारी चांगला माणूस घडवण्याचे काम या महाविद्यालयातून होते म्हणूनच आज विविध क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी आपल्या ज्ञानाच्या बळावर तेथे नेत्रतत्व करत आहेत. नुकतेच सुदाम नरहरी मुंडे यांची वनपरिक्षेत्र अधिकारी या पदावरून सहाय्यक वन संरक्षक अधिकारी क्लास वन पदी पदोन्नती झाली याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी सन २०१३ ते १५ मध्ये आदित्य शिक्षण संस्थेच्या कृषी महाविद्यालयात शिक्षण घेतले. कृषीचे शिक्षण घेत असताना महाविद्यालयात असलेल्या स्पर्धा परीक्षेच्या क्लासेसचा मुंडे यांनी लाभ पान २ वर...



बीड : मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर माजी मंत्री बाबा सिद्दीकी आणि बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची भेट झाली.

## धनंजय मुंडे: गेवराईत श्री चक्रधर स्वामी अवतार दिन

# विकासास निधी कमी पडु देणार नाही

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री चक्रधर स्वामींनी कोणत्याही जात, धर्म किंवा सांप्रादायाच्या विचाराचे खंडन न करता महानुभाव पंथाचा प्रसार केला. आजच्या काळात सर्वधर्मीयांनी त्यांची शिकवण घेतली पाहिजे. गीतेतील उपदेश त्यांनी सामान्य भाषेत लोकांना कळतील अशा पद्धतीने मांडले, मराठी साहित्य परंपरेची खर्या अर्थाने सुरुवात चक्रधर स्वामींनी केली. त्यांच्या अवतार दिनाच्या औचित्याने महायुती सरकारने त्यांना अनोखे नमन केले. राज्यातील पाच देवस्थानांच्या विकासासाठी ७८ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला असुन महानुभाव पंथीयांच्या तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी कमी पडु देणार नाही असे प्रतिपादन कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी केले. श्री चक्रधर स्वामींची शिकवण समाजाला सदैव प्रेरणा




देईल असे प्रतिपादन विजयसिंह पंडित यांनी केले. अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या वतीने गेवराई येथे आयोजित सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

अखिल भारतीय महानुभाव परिषदेच्या बीड जिल्हा शाखेने महानुभाव पंथ प्रर्वतक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिन महोत्सवाचे रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी भव्य आयोजन केले होते. महोत्सवाचे स्वागताध्यक्ष म्हणुन बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी महोत्सवानिमित्त एकत्रित आलेल्या सर्व संतमहंतांचे स्वागत केले. महोत्सवाचे उद्घाटन बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी केले. यावेळी आचार्य श्री उपाध्य कुलभुषण श्री शेवलीकर बाबाजी उर्फ धाराशिवकर, आचार्य श्री कळमकर बाबाजी महानुभाव, साहित्याचार्य श्री संतोष शास्त्रीजी कपाटे, ह.भ.प.श्री. योगोश्वर उपासणी महाराज, आचार्य मानेकर बाबाजी शास्त्री, ह.भ.प.श्री. शाम चैतन्यजी महाराज, श्रद्धेय संत श्री गोपाल चैतन्यजी महाराज, महंत श्री कृष्णराज बाबा गुर्जर, महंत श्री मल्लेबाबा शास्त्री, महंत पान २ वर...

# हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र

## दिलासा: धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्याला आले यश

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्र सरकारकडे मागील काही दिवसांपासून केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये ९० दिवसांसाठी किमान हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने धनंजय मुंडे यांच्या मागणीनुसार समर्थन मूल्य योजनेच्या अंतर्गत सोयाबीन व उडीद ही दोन पिके ९० दिवसांसाठी हमीभावाने खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान हे राज्य कृषी महोत्सवाच्या निमित्ताने परळीत आले तेव्हा



धनंजय मुंडे यांनी याबाबत मागणी केली होती, तसेच दिल्ली येथे भेटूनही याबाबत पाठपुरावा केला होता.केंद्र सरकारने महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ही ४८९२ रुपये प्रति क्विंटल इतकी निश्चित केली असून, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांसह वेळोवेळी पाठपुरावा व समर्थन देणारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत. राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी व त्यांचे बाजारभाव पडल्याने नुकसान होऊ नये या दृष्टीने हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात यावी, त्याचबरोबर सोया मिल्क, खाद्यतेल, सोया केक इत्यादी उत्पादने आयात करण्यावर शुल्क लावावे तसेच सोयाबीन निर्यातीसाठी प्रतिक्विंटल किमान ५० डॉलर अनुदान द्यावे याबाबत मी केंद्र सरकारकडे पान २ वर...